# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः13.06.2024** **वारःगुरुवार**

---

1 ) जी सात देशांच्या शिखर परिषदेसाठी  पंतप्रधान नरेंद्र मोदी  आज इटली दौऱ्यावर

2 ) देशातील औद्योगिक उत्पादन वाढीच्या दरात  यावर्षी एप्रिल मध्ये 5 टक्क्यांवर

3 ) कुवेतमधल्या मंगाफ शहरात लागलेल्या आगीत चाळीस भारतीय नागरिकांचा मृत्यू तर 50 भारतीय जखमी

4 ) 18 वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मुंबईसह अन्य शहरांमध्ये येत्या 15 ते 21 जून दरम्यान होणार

आणि

5 ) टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा काल यजमान अमेरिका संघावर विजय

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज  इटलीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते अपुलिया इथं उद्या होणाऱ्या जी सात देशांच्या शिखर परिषदेत भाग घेणार आहेत.परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे सचिव विनय क्वात्रा यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. जी सात परिषदेत भारताला संपर्क देश म्हणून आमंत्रित करण्यात आल असून ,पंतप्रधानपदाचा तिसऱ्यांदा पदभार स्वीकारल्या नंतर मोदी यांचा हा पाहिलाच परदेश दौरा आहे . जी सात  परिषदेत   भारताला  आमंत्रित करण्याची ही 11 वी वेळ असून , यामध्ये पंतप्रधान मोदी उद्या 5 व्यांदा  सहभागी होत आहेत .ते  उद्या  संपर्क देशांसाठीच्या सत्रात सहभागी होतील. या परिषदेत जगातील प्रमुख राष्ट्रांच्या प्रमुखांशी  भारत आणि इतर विकसनशील देशांच्या  महत्वपूर्ण प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्याची संधी मिळणार असल्याच विनय क्वात्रा यांनी सांगितल .या शिखर परिषदेच्या निमित्ताने जी सात राष्ट्रांच्या नेत्यांशी  पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा करणार असून , इटलीच्या  पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचीही ते भेट  घेणार आहेत .

दरम्यान , या महिन्यात स्विर्झलँड इथ होणाऱ्या यूक्रेन शांतता परिषदेत भारत सहभागी होणार असून त्यात जगातील 90 देश सहभागी होणार आहेत अशी माहितीही  विनय क्वात्रा यांनी यावेळी दिली.

**<u>उत्पादन</u>** वाढ दर

देशातील औद्योगिक उत्पादन वाढीचा दर  यावर्षी एप्रिलमध्ये 5 टक्के राहिला आहे . मागील वर्षी एप्रिलमध्ये हा दर 4 पूर्णांक 6 टक्के होता, यावर्षी खाण  क्षेत्रातील  वाढीमुळे तो 6 पूर्णांक 7 टक्क्यांपर्यंत

पोहोचला आहे. केंद्रीय सांखिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार यावर्षी उत्पादन क्षेत्रात 3 पूर्णांक 9 तर वीज क्षेत्रात 10 पूर्णांक 2 टक्क्यांची वृद्धी झाली आहे. उत्पादन वाढीच्या दारात वाढ होण्यामागे प्राथमिक वस्तूं , पायाभूत क्षेत्रातील वस्तू आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनातील वाढ मुख्यतः कारणीभूत आहे .

दरमहा वाढीच्या तुलनेत मात्र औद्योगिक उत्पादन वाढीच्या दरात एप्रिल महिन्यात घट झाली. एप्रिल महिन्यात हा दर 5 टक्के राहिला. मार्चमध्ये तो 5 पूर्णांक 4 तर फेब्रुवारीत तो 5 पूर्णांक 6 टक्के होता.

**IMF**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने श्रीलंकेसाठी विस्तारित निधी सुविधेचा दुसरा आढावा मंजूर केला आहे. श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री अली साबरी यांनी सांगितलं की IMF मंडळाची मान्यता ही आर्थिक सुधारणांना पुढे नेण्यासाठी श्रीलंका सरकारनं दाखविलेल्या निष्ठेचा पुरावा आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये, IMF ने 2 पूर्णांक 9 अब्ज अमेरिकी डॉलर्स वित्त पुरवठा मंजूर केला होता, तो 48 महिन्यांच्या कालावधीत श्रीलंकेसाठी उपलब्ध आहे.

**पॅनल चर्चा**

आंतरराष्ट्रीय योग दिनापूर्वी, दुबईमध्ये "योगा विथ आयुष: महिलांच्या आरोग्याचे सक्षमीकरण" या शीर्षकाखाली एका परिचर्चेचं आयोजन करण्यात आलं होतं. आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी यांसारख्या पारंपारिक भारतीय वैद्यक पद्धतींशी जोडलेला योग, महिलांच्या आरोग्यावर खोलवर कसा परिणाम करू शकतो, याचा शोध घेणाऱ्या, "महिला सक्षमीकरणासाठी योग" या योग दिनाच्या संकल्पनेवर हा कार्यक्रम केंद्रित होता. आरोग्य सल्लागार रामिंदर जीत कौर यांनी महिला सक्षमीकरण आणि आरोग्यासाठी योगाच्या परिवर्तनीय शक्तीवर अभ्यासपूर्ण विचार मांडले. योगाद्वारे महिलांचं सक्षमीकरण विशेषत: रजोनिवृत्तीच्या काळात त्यांच्या विशिष्ट शारीरिक आणि भावनिक गरजांमुळे महत्त्वपूर्ण आहे, असं नमूद करुन कौर म्हणाल्या की, 40 ते 55 वयोगटातील 85 टक्के महिलांना रजोनिवृत्तीची गंभीर लक्षणं जाणवतात, त्यावर योगाभ्यासाचा उपचार प्रभावी ठरु शकतो.

**कुवेत आग**

कुवेतमधल्या मंगाफ शहरात मजूर निवासासाठी असलेल्या सहा मजली इमारतीला लागलेल्या आगीत काल, चाळीस भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून 50 भारतीय नागरिक जखमी झाले आहेत. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. परराष्ट्र व्यवहार राज्य मंत्री कीर्तिवर्धन सिंग यांना कुवेतमध्ये जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती हाताळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काही देह इतके जळाले आहेत की त्यांची ओळख पटवणं अशक्य असल्याचं सिंग यांनी दौऱ्यावर निघण्यापूर्वी सांगितलं. पंतप्रधानांनी काल एका बैठकीत या घटनेचा आढावा घेतला. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये मदत भारतानं जाहीर केली आहे.

जखमींना 5 सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आल असून बहुतांश जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली असल्याचही भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने सांगितल आहे .दरम्यान कुवेत

मधील भारताचे राजदूत आदर्श स्वाईक यांनी दुर्घटना स्थळाला तसच भारतीय जखमी नागरिक दाखल असलेल्या रुग्णालयांना भेट दिली. तसच त्यांना आवश्यक ती सर्व मदत देण्यासाठी स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्क आणि समन्वय करत असल्याची माहिती दिली.

**मिफ्फ**

18 वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मुंबईसह अन्य शहरांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. यंदा मुंबईबरोबरच दिल्ली,कोलकाता,चेन्नई आणि पुणे या शहरांमध्येही मिफमधील चित्रपट पाहता येणार आहेत. 15 ते 21 जून दरम्यान या चारही शहरात हा महोत्सव होत असून , जगभरातील सर्वोत्कृष्ट माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशन पटांसारखे कथाबाह्य चित्रपट यात प्रदर्शित केले जातील. मुंबईत फिल्म डिविजन च्या चित्रपटप्रदर्शन सभागृहात 15 जूनला या महोत्सवाची मुख्य सुरवात होणार आहे . मिफ महोत्सव दक्षिण आशियातील सर्वात भव्य आणि सर्वात जुना कथाबाह्य चित्रपट महोत्सव म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात दिव्यांग कलाकारांसाठी विशेष विभाग ठेवण्यात आला असून , त्यांनी बनवलेल्या चार निवडक चित्रपटांचं प्रदर्शन 19 जूनला करण्यात येणार आहे .

**US FED बैठक**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह या मध्यवर्ती बॅंकेनं व्याजदर आहे तसाच ठेवला आहे, मात्र चलनवाढ आटोक्यात ठेवण्याची शिकस्त सुरू असल्यामुळं वर्षाच्या अखेरीस या व्याज दरात एकदा कपात होऊ शकते असे संकेत दिले आहेत. उच्च अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या बैठकीनंतर काल बॅंकेनं ही घोषणा केली. सलग सातव्या बैठकीत हा व्याजदर 5 पूर्णांक 25 टक्के आणि 5पूर्णांक 50 टक्के दरम्यान राखण्यात आला. फेडरल रिझर्व्हला यावर्षी तीनवेळा दरामध्ये कपात जाहीर करण्याची अपेक्षा होती. कारण महागाई खाली येण्याची चिन्हे दिसत होती, परंतु प्रत्येक वेळी चलनवाढ वरचढच राहिल्यानं बॅंकेनं दर कमी केला नाही. महागाईचा दर दोन टक्क्यांच्या खाली आणण्याचं या बॅंकेचं उद्दिष्ट आहे.

**CPI- मे डेटा**

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, मे 2024 मध्ये भारतातील किरकोळ चलनवाढीचा दर एका वर्षातील सर्वात कमी 4 पूर्णांक 75 शतांश टक्क्यांवर आला आहे. यावर्षी एप्रिल महिन्यात, ग्राहक किंमत निर्देशांक 4 पूर्णांक 83 शतांश टक्के होता.

**बालमजुरी**

जागतिक बालमजुरी विरोधी दिवस काल पाळण्यात आला. बालमजुरीविरुद्ध जागरुकता वाढविणं आणि बालमजुरीचे सर्व प्रकार बंद करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याच्या उद्देशानं हा दिवस दरवर्षी पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मते, जगभरात सुमारे सोळा कोटी मुलं बालमजुरीत गुंतविण्यात आली आहेत, त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा हक्क हिरावला जातो आणि त्यांचे कल्याण आणि भविष्य धोक्यात येते. यावर्षीच्या जागतिक बालमजुरी विरोधी दिवसाची मध्यवर्ती संकल्पना चला आपल्या वचनबद्धतेवर काम करूया: बालमजुरी समाप्त करा अशी आहे.

**टी-20 विश्वचषक**

आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतानं काल यजमान अमेरिका संघाला सात गडी राखून पराभूत केलं. न्यूयॉर्क इथं झालेल्या सामन्यात अमेरिकेनं प्रथम 110 धावा केल्या. अमेरिकेच्या नितीश कुमारनं 23 चेंडूत सर्वाधिक 27 धावा केल्या तर भारताच्या अर्शदिप सिंगने उत्तम गोलंदाजी करत अमेरिकेचे 4 गडी बाद केले. भारताच्या फलंदाजीची सुरवात मात्र चांगली झाली नाही . विराट कोहली सौरभ नेत्रावळकरच्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला,तर दुसऱ्याच षटकात रोहित शर्मा तीन धावांवर बाद झाला. मात्र सूर्यकुमार यादवनं अर्धशतक करून शिवम दुबेच्या साथीनं भारताला विजय मिळवून दिला. या विजयामुळं अंतिम आठ संघांसाठी भारत पात्र ठरला असून अ गटात भारताला अजून एक सामना खेळायचा आहे.

**हवामान**

येत्या ४-५ दिवसांत उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, आणि झारखंडच्या काही भागांत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. तर अन्य काही राज्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस काल महाराष्ट्राच्या आणखी काही भागात सक्रिय झाला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.